आणि ये कृष्णमूर्तीचे सवे | या लागी सोय धरली जीवे | तंव नको म्हणून देवे | वारीले माते ||२२|१२|ज्ञा.

“मूर्तीची सवय होती म्हणून मनाने (मी) त्याचा आश्रय केला तेव्हा सगुण मूर्तीवर असे प्रेम करणे चांगले नाही असे मला देवांनी बजावले (होते)” असा या ओवीचा हा अर्थ आहे. त्याची पार्श्वभूमी अशी की आधीच्या अकराव्या अध्यायात जेव्हा श्रीकृष्ण आपले अक्राळ विक्राळ, दाहक आणि भक्तियुक्त असे विश्वरूप दाखवतो तेव्हा मला हे सहन होत नाही . मला तुझे चतुर्भुज रूप दाखव असे अर्जुन म्हणतो तेव्हा त्याला प्रत्युत्तर म्हणून

अरे अडाण्या | सांगू तरी काय तुला | अंग सोडून मारतोस मिठी | छायेला ||६२९|११|ज्ञा.

अशी ओवी सांगून झाली आहे. परंतु बारावा अध्याय मात्र मुर्तीपुजेबद्दलच आहे असा सार्वजनिक समज आहे. गीतेत असे प्रसंग अनेक ठिकाणी येतात आणि वरच्या ओवीतल्या अडाण्याला आता मूर्ति पूजेचे समर्थन करण्यासाठी तर हा बारावा अध्याय नाही ना असा संशय उत्पन्न व्हावा अशी स्थिति आहे. ब्रह्मदेवाला अनेक तोंडे होती परंतु गीता सुद्धा अनेक तोंडाने किंवा निरनिराळ्या तऱ्हेने बोलते की काय असे म्हणण्यास खचितच वाव आहे. नेह नानास्ती किंचन ह्या सुप्रसिद्ध उद्गारात इथे अनेक वस्तू नाहीत किंवा एकच वस्तू आहे असा अर्थ आला आहे. असे जर आहे तर मग त्या एका वस्तूच्या म्हणजे ब्रह्माच्या मागे का लागू नये असा प्रश्न आहे. त्याचे उत्तर असे की त्या एकमेव वस्तूतून निघालेल्या अनेक वस्तूंमुळे आपल्याला ती मूळ वस्तू जाणवत नाही. जाणवली जाते ती विविधता. शिवाय माणसांमध्ये असते ती विविधता निराळीच. एकंदरच आयुष्यातल्या परीक्षेत प्रश्न आणि त्यांची उत्तरे ह्यामध्ये अनेक प्रकारचे ऑप्शन्स , पर्याय असू शकतात किंवा असतात. यशस्वी उद्योग समूहांमध्ये कोणी किती कल्पक कुशल आणि कामसू आहे ह्यावर ज्याप्रमाणे त्याच्यावर जबाबदारी टाकली जाते त्याप्रमाणेच इथेही मूळ वस्तूविषयी किंवा विश्वामागच्या रहस्या बद्दलच्या उत्सुकतेबद्दल अनेक पर्यायाने जाणून घेता येते. त्याच्यातला एक मार्ग भक्तिमार्ग आहे. आणि त्याबद्दल बारावा अध्याय आहे. ही अंतिम जाण झाली तर सुख लागते. शेवटी सुख लागण्यासाठीच आपण सगळे झगडत असतो. अर्थात बारावा अध्याय जसा जसा पुढे जातो तसे तसे ध्यानात येऊ लागते की हा अध्याय केवळ मूर्तिपुजे बद्दल नसून त्यातही अनेक पर्याय सांगितले आहेत. त्या बद्दल पुढच्या लेखातून.

३२५ शब्द

रविन थत्ते
rlthatte@gmail.com

तरि व्यक्त आणि अव्यक्त | हे तूंचि एक निभ्रांत | भक्ति पाविजे व्यक्त | अव्यक्त योगे ||२३|१२|ज्ञा.

तू व्यक्त आणि अव्यक्त दोन्ही स्वरूपात असतोस हे नक्की. भक्तिने व्यक्त स्वरूपाचे आणि योगाने अव्यक्त स्वरुपाची प्राप्ती होते. असा वरच्या ओवीचा अर्थ आहे. ज्या गीतेच्या श्लोकावर ही ओवी येते त्यात व्यक्त आणि अव्यक्त अशी विभागणी केलेली नाही. बहुतेक भाषांतरात व्यक्त हा शब्द कंसात येतो आणि तो कंस भाषांतरकाराने स्वतःच्या मनाने घेतलेली मुभा आहे. परमेश्वर जर असेल आणि तो आहेच. केवळ त्याच्या स्वरूपाविषयी आणि कर्तबगारीबद्दल वादविवाद आहेत. हे बघता त्याला मिळवायचे कसे असा प्रश्न निर्माण होतो. तो परमेश्वर किंवा ते ब्रह्म आपल्याला जसे विश्वरूप दर्शनात दिसते तसेच संसार वृक्षात त्याचे आस्तित्व असते, विशेष गोष्टींमध्ये तोच असतो आणि सर्वसाधारण माणसातले चैतन्य तोच असतो. वरच्या ओवीत भक्तीमुळे व्यक्त (मूर्ति) स्वरूपातला परमेश्वर प्राप्त होतो इथपर्यंत ठीक आहे. पंरतु अव्यक्त स्वरूपात परमेश्वर (किंवा ब्रह्म) योगाने प्राप्त होतो असे विधान आहे. हा योग कोठला? एक सुप्रसिद्ध वाक्य आहे ते असे. कर्मयोगाला भक्तीचा ओलावा हवा, ज्ञानाला कर्माचे हातपाय हवेत आणि भक्तीला ज्ञानाचे डोळे हवेत असे ते वाक्य आहे. ह्या वाक्याचे तिन्ही भाग उलट सुलट मांडले तरी सार्थ ठरतात. वरील ओवीतल्या योग ह्या शब्दाला कोठे बसवायचे असा प्रश्न आहे. त्याचे उत्तर ज्ञानेश्वरीत लागोलगच सापडते ह्याचे कारण गीतेच्या बाराव्यातल्या चौथ्या श्लोकावर ओव्या लिहितांना ज्ञानेश्वरांनी “इंद्रिय नियमन” ह्या त्या श्लोकातल्या शब्दांवर तेरा ओव्या सांगितल्या आहेत. आणि त्या सगळया ‘कुंडलिनी योग’ या दुर्धर आणि सामान्य माणसाच्या आवाक्याच्या बाहेरच्या आहेत तेव्हा ते प्रकरण आपल्यापुरते तरी तिथेच संपते. प्रश्न उरतो तो असा की मूर्तीपूजा सरस की अव्यक्त ब्रह्माची उपासना जास्त योग्य. विश्वरूप दर्शन दाखवल्यानंतर मूर्तीपूजा ही हिणकस आहे असे सांगणारा श्रीकृष्ण बाराव्यात सामोपचाराची भूमिका घेत काय म्हणतो ते बघा.

लगडीभर असो किंवा तोळा | सोन्याचा कस असतो तेवढाच || २५|१२|ज्ञा. अर्थात व्यापक आणि व्यक्त (मूर्ति) ह्या दोघांची चढाओढ नसते किंवा त्यांच्या भक्ती मध्ये अंतर नसते. दोघांची उद्दिष्टे आणि परिणाम एकच असतात असे श्रीकृष्णाचे विधान आहे. ही अकराव्या अध्यायातल्या विधानापासून घेतलेली माघारच आहे. कारण इथे बाराव्या अध्यायातला चौथा श्लोक असे स्पष्ट सांगतो की माझ्या ठिकाणी मन ठेऊन नित्ययुक्त होऊन अतिशय श्रद्धेने असे जे माझी उपसना करतात ते सर्वात उत्कृष्ट योगी मी समजतो. इथे मामला संपतो का? तर नाही. अव्यक्ताची भक्ती किती अवघड आहे त्या बद्दल पुढच्या प्रकरणात.

३५४ शब्द

रविन थत्ते
rlthatte@gmail.com